**BDC LIBRARY**
**News Paper Clipping**
**A.Y. 2025-26**

# ध्येयासक्त चिकाटी यशस्वी जीवनाचा मंत्र

## डॉ. सुनील मगर : ढोरोशी येथील श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

**वार्ताहर**
पाटण

स्पर्धेच्या युगात यशस्वी होण्यासाठी स्वत:ला सतत अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. जीवनात संधी एकदाच येते, त्यामुळे आलेल्या संधीचे सोने करा. अभ्यासातील सातत्य, प्रामाणिकपणा परिश्रम आणि ध्येयासक्त चिकाटी हाच यशस्वी जीवनाचा मंत्र असल्याचे प्रतिपादन माजी शिक्षण संचालक डॉ. सुनील मगर यांनी केले.

येथील कोयना एज्युकेशन सोसायटीचे बा. दे. कॉलेजचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ढोरोशी (ता. पाटण) येथे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कोयना एज्युकेशन सोसायटीचे सदस्य कृष्णराजे राजेमहाडिक होते. यावेळी प्र. प्राचार्य डॉ. व्ही. ए. कळंत्रे, सरपंच महेंद्र मगर, सोसायटीचे चेअरमन राजाराम भंडारे यांची उपस्थिती होती.




**ढोरोशी : संजीव चव्हाण यांचे स्वागत करताना प्र. प्राचार्य व्ही. ए. कळंत्रे.**

डॉ. कळंत्रे म्हणाले, आजच्या तरुणांनी केवळ परीक्षार्थी न बनता ज्ञानार्थी बनले पाहिजे. आव्हाने स्वीकारुन ती परिस्थिती बदलण्याची ताकद आजच्या तरुण पिढीमध्ये आहे.

कृष्णराजे राजेमहाडिक यांनी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. एल. जी.गणगे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. पी. आर. गायकवाड यांनी आभार मानले.